CIN No.U40109MH2005SGC153646

# अउदा प्रकल्प-नि-संवसु परिमंडळ, वाशी

## उच्चस्तर लिपीक (मासं) व वरिष्ठ यंत्रचालक या पदाच्या लेखी परिक्षेबाबत सुचना

---------

वाशी पारिमंडळ कार्यालयाने माहे फेब्रूवारी-२०१७ मध्ये अंतर्गत अधिसुचनेद्वारे विविध पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसारित केली होती.

२. त्या अनुषंगाने उच्चस्तर लिपीक (मासं) व वरिष्ठ यंत्रचालक या पदांची लेखी परिक्षा दि. २४/१०/२०१७ रोजी आयोजीत केली आहे. परिक्षेची वेळ, ठिकाण खालील प्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| परिक्षा दिनांक | २४/१०/२०१७ |
| परिक्षा ठिकाण | रयत शिक्षण संस्थेचे मॉडर्न कॉलेज, वाशी, सेक्टर-१५ए, वाशी, नवी मुंबई |
| परिक्षेची वेळ | सकाळी ११.०० ते ०१.०० |
| पारिक्षेस उपस्थित राहण्याची वेळ | सकाळी १०.०० |

३. **लेखी परिक्षा पत्र (Call Letter)** उमेदवारांना अर्जात नमुद केलेल्या ई-मेल वर पाठविण्यात येत आहेत.

**४. लेखी परिक्षेचे स्वरुप :-**

**उच्चस्तर लिपीक (मासं)**

| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम** | प्रश्नपत्रीकेमधील प्रश्न हे आस्थापना विषयक (Establishment Matters) वर राहतील जसे की, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित सेवाविनियम २०१२ (MSETCL Employees' Service Regulation 2012), म.रा.वि.मंडळ वर्गिकरण व भरती अधिनियम, १९६१ (Classification & Recruitment Regulation, 1961),सेवाजेष्ठता विनियम (Seniority Regulation), सामान्य आदेश (General Orders), सर्वसाधारण आदेश (General Standing Order), प्रशासकीय परिपत्रके (Administrative Circulars), विभागिय परिपत्रके (Departmental Circulars) व दैनंदिन मानव संसाधन विभागाच्या कामकाजाशी संबंधीत बाबींबर आधारीत असतील |
| **प्रश्नाचे स्वरुप** | वस्तूनिष्ठ स्वरुपाचे (Multiple choice questions) |
| **प्रश्नसंख्या** | १०० |
| **एकुण गुण** | १०० गुण (प्रत्येक प्रश्नास १ गुण ) |
| **परिक्षा कालावधी** | २ तास |

**वरिष्ठ यंत्रचालक**

| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम** | प्रश्नपत्रीकेमधील प्रश्न हे मुंबई विद्यापिठाच्या Diploma in Electrical Engineering या पदवीच्या अभ्यासक्रमावार आधारीत असतील<br>**(अभ्यासक्रमाच्या प्रतीसाठी येथे Click करा)** |
| **प्रश्नाचे स्वरुप** | वस्तूनिष्ठ स्वरुपाचे (Multiple choice questions) |
| **प्रश्नसंख्या** | १०० |
| **एकुण गुण** | १०० गुण (प्रत्येक प्रश्नास १ गुण ) |
| **परिक्षा कालावधी** | २ तास |

-२/-

५. अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परिक्षेस बोलविण्यात येत आहे. लेखी परिक्षेस उमेदवारांना बोलविण्यापुर्वी त्यांच्या पात्रतेची म्हणजेच वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, इ. बाबतची पडताळणी करण्यात आलेली नाही. सबब, उमेदवाराने लेखी परिक्षेकरीता हजर होण्यापुर्वी जाहिरातीत नमूद केलेल्या विहित शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, प्रमाणपत्रे इत्यादी बाबी धारण करत असल्याची खात्री करावी.

**लेखी परिक्षेस हजर राहण्याबाबतच्या सुचना :-**

६. लेखी परीक्षेस हजर होताना उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१) लेखी परिक्षेस उपस्थित राहण्याबाबत वाशी पारिमंडल कार्यालयाने जारी केलेले वैध call letter.

२) महापारेषण कंपनीचे ओळखपत्र अनिवार्य आहे. तसेच ओळखपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

**३) महिला उमेदवारांसाठी :-**

महिला उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव व ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव हे एकसमान असणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव हे ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव पेक्षा वेगळे असेल अशा महिला उमेदवारांना परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

४) लेखी परिक्षेसाठी विहीत केलेल्या वेळेनंतर कोणत्याही कारणास्तव उशिराने हजर होणाऱ्या उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

५) परिक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबंधीच्या विविध औपचारिकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्जदाराने परीक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेल्या वेळेच्या आधीच परिक्षाकेंद्रावर हजर राहणे अपेक्षीत आहे.

**६) ओळखपत्र तपासणी :-**

परिक्षा केद्रांवर/परिक्षा सभागृहात उमेदवारांच्या परीक्षा पत्राची (Call letter), मूळ छायाचित्र ओळखपत्राची तपासणी करण्यात येईल. उमेदवार स्वतःची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास अशा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

७. लेखी परीक्षेकरिता स्वखर्चाने हजर रहावे. याकरीता कोणत्याही प्रकारच्या प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही.

८. उमेदवाराने लेखी ळोखी परिक्षेस स्वतःच्या जोखीमवर उपस्थित रहावे. महापारेषण कंपनी कोणत्याही प्रकारच्या दुखापतीस अथवा हानीस जबाबदार राहणार नाही.

**(संजय शिंदे)**
**मुख्य अभियंता**
**अउदा प्रकल्प-नि-संवसु परिमंडळ, वाशी**

**दि. ०६.१०.२०१७**

******